# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

पुण्यनगरी
पुणे मंगळवार, ४ मार्च २०१४
१०

# 'आय विल व्होट'चा तीन हजार विद्यार्थ्यांचा निर्धार

## राजगुरू महाविद्यालयात राबविला उपक्रम

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

खेड तहसीलदार निवडणूक विभाग आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर यांच्या माध्यमातून 'आय विल व्होट' उपक्रमात महाविद्यालयातील सुमारे तीन हजार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची शपथ घेऊन निर्धार केला.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात या उपक्रमाचे आज (दि. ३) आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयातील तरुण-तरुणींनी मतदान करण्याचा निर्धार केला. भारतीय घटनेने मला दिलेला मतदानाचा जो अमूल्य अधिकार आहे त्या अधिकाराचा कोणत्याही परिस्थितीत वापर करीन. मतदान करून आपल्या पसंतीचा उमेदवार निवडण्याचा माझा फक्त अधिकारच नसून ती माझी राष्ट्रीय जबाबदारी आहे. देशहिताकरिता जनतेच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करू शकणाऱ्या सर्वोत्तम उमेदवाराची निवड करण्यासाठी मी आणि माझ्या कुटुंबातील सदस्यांना तसेच परिचित व्यक्तींना मतदान करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित करीन. कोणत्याही भीतीपोटी, लालसेपोटी मतदान करणार नाही. तसेच धर्मनिरपेक्ष भावनेने मतदान करण्याची जबाबदारी मी पार पाडीन, असा निर्धार विद्यार्थ्यांनी केला.

निवडणूक नायब तहसीलदार लतादेवी वाजे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शपथ दिली. या वेळी प्रा. अविनाश कोहिनकर, प्रा. दिलीप मुळूक यांच्यासह महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



राजगुरूनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित 'आय विल व्होट' उपक्रमात सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख